# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### वणिज्य विभाग

लोकमत पुणे, सोमवार, दि. ८ ऑक्टोबर २०१८

## माजी विद्यार्थ्यांनी दिले कपाट भेट

राजगुरूनगर – हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००२ ते २००७ या वर्षातील वाणिज्य शाखेच्या माजी विद्यार्थ्यांनी वाणिज्य विभागाला एक कपाट भेट दिले. त्याचा स्वीकार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे यांनी केला. याप्रसंगी डॉ. संजय शिंदे, डॉ. टी. जी. गिते, कार्यालय अशीक्षक ए. के. अंकुश, प्रा. गणेश घुमाळ, प्रा. पायल ओसवाल उपस्थित होते. बाळासाहेब सांडभोर यांनी सामाजिक बांधिलकी ठेऊन माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या जडणघडणीत योगदान देताना विविध उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. माजी विद्यार्थी किरण पावडे, सचिन पिंगळे, प्रदिप घुमटकर यांनी आपण यापुढेही असे विद्यार्थी हिताचे उपक्रम राबावणार असून या माध्यमातून आम्हाला वेगळा आनंद अनुभवायला मिळत असल्याची भावना व्यक्त केली. डॉ.एच. एम. जरे यांनी आभार मानले.



राजगुरूनगर: येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी वाणिज्य शाखेस कपाट भेट दिले.

पुढारी | पुणे, शनिवार
३ नोव्हेंबर २०१८

# माजी विद्यार्थ्यांकडून कपाट भेट

**राजगुरुनगर** : राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या माजी विद्यार्थ्यांनी वाणिज्य विभागास लोखंडी कपाट भेट दिले आहे. त्याचा स्वीकार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ.एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ.एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे यांनी केला.

डॉ. संजय शिंदे, डॉ. टी. जी. गिते, कार्यालय अधीक्षक ए. के. अंकुश, प्रा. गणेश धुमाळ, प्रा. पायल ओसवाल यावेळी उपस्थित होते.

यावेळी किरण पावडे, राहुल पिंगळे, प्रदीप घुमटकर, नवनाथ पवळे, सचिन पिंगळे, नीलेश गवते, प्रसाद गाडगे, समीर वाटेकर, संदीप सावंत, गणेश तनपुरे, किशोर तोत्रे यांनी सहकार्य केले.

माजी विद्यार्थी किरण पावडे, सचिन पिंगळे, प्रदीप घुमटकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. एच. एम. जरे यांनी आभार मानले.



हुतात्मा महाविद्यालयात वाणिज्य विभागास लोखंडी कपाट भेट देताना विद्यार्थी.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख